मंगळवार दि. १६ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

## पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया मोहिम यशस्वी करा : जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

### २८ जुन रोजी २ लाख ५३ हजार बालकांना देण्यात येणार पोलिओची मात्रा

**जालना -प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय पल्स पोलिओ मोहिमेची सभा जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये संपन्न झाली. पल्स पोलिओ मोहिमेसाठी सुक्ष्मकृती आराखडयाचे काटेकोरपणे पालन करुन एकही ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पल्स पोलिओ मधुन वंचित राहणार नाही असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. पल्स पोलिओ मोहिम अंतर्गत जालना जिल्हयातील ० ते ५ वयोगटातील २ लक्ष ५३ हजार बालकांना पोलिओची मात्रा रविवार, २८ जुन रोजी देण्यात येणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी सांगितले. स्टॉप डायरिया मोहिम अंतर्गत ५ वर्षाखालील बालकांना ओ.आर.एस. व झिंक टॅबलेट घरोघरी जाऊन देण्यात येणार आहे. यामध्ये ओ. आर. टी. कॉर्नर स्थापन करण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.जयश्री भुसारे यांनी पल्स पोलिओ, स्टॉप डायरिया, एच. पी. व्ही. लसीकरण, गोवर व रुबेला दुरीकरण मोहिम विषयी माहिती दिली. एच. पी. व्ही. लसीकरण वाढविणे त्यासाठी शाळांना भेटी देणे. ई-संजीवनी ओ.पी.डी. वाढविणे. महात्मा फुले जन आरोग्य योजनांचा लाभ ग्रामीण रुग्णालय,



प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी द्यावा. रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देऊन रेफर करणे शक्यतो टाळावे. आपल्या आरोग्य संस्था नियमित स्वच्छ असाव्यात. तालुका आरोग्य अधिकारी यांनी आपल्या पी.एच.सी.ला नियमित भेटी देऊन सर्व आरोग्य उपक्रमांचा आढावा घेऊन स्वच्छता पाहणी करण्याचे निर्देश दिले.

यावेळी डॉ.जयश्री भुसारे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.राजेंद्र पाटील जिल्हा शल्य चिकीत्सक, डॉ.तरुणा छाबडा अध्यक्ष इंडियन असोसिएशन ऑफ पीड्रीयाट्रिक, डॉ.बळीराम बागल अध्यक्ष आयएमए, डॉ.शुंभागी मिसाळ प्रपाठक शासकिय वैद्यकिय महाविद्यालय डॉ.श्रीकांत देसाई माता बाल संगोपन अधिकारी, डॉ.एन.जी.पवार साथरोग अधिकारी, वैद्यकिय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी व
कर्मचारी उपस्थित होते.

## दुधना नदीपात्रातील अवैध वाळू उपशावर एलसीबीची मोठी धडक

### जेसीबी, दोन हायवा व ४ ब्रास वाळूसह ५० लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त; तीन आरोपी रंगेहात अटकेत

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) तालुका जालना पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुधना नदीपात्रात मोठी धडक कारवाई केली आहे. दुधना नदीच्या काळेगाव परिसरात सुरू



असलेल्या अवैध वाळू उपसा प्रकरणात पोलिसांनी एक जेसीबी मशीन, दोन हायवा ट्रक आणि ४ ब्रास वाळूसह तब्बल ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून तीन आरोपींना रंगेहात अटक करण्यात आली आहे.
पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार दि. १४ जून २०२६ रोजी सकाळच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. अवैधरित्या नदीपात्रातून वाळूचा *(पान २ वर)*

## कार्यकर्त्यांच्या एकजुटीतून संघटन विस्ताराचा संकल्प; तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे

**मंठा -प्रतिनिधी**

येथे शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच गावपातळीपर्यंत शिवसेनेचे कार्य प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.
यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे, उद्योग सेना जिल्हाकार्याध्यक्ष प्रल्हादरावजी बोराडे,



तालुकाप्रमुख उदयदादा बोराडे, उपजिल्हाप्रमुख किसनरावजी मोरे, माजी सभापती संतोषराव वरकड यांची प्रमुख उपस्थिती होती.
बैठकीत संघटन विस्तार, नव्या कार्यकर्त्यांची जोडणी, आगामी कार्यक्रमांचे नियोजन आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार करण्यात आला.
यावेळी तुळशीरामजी कुहीरे, बंडु नाना मोरे, उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, अक्षय दीप वाघमारे, भगवानराव गायकवाड, विलास राठोड,दलित आघाडी तालुकाप्रमुख दिलीपराव हिवाळे, पप्पू शेठ दायमा, दलित आघाडी उपजिल्हाप्रमुख नितीन मोरे, सतीश देशमुख, पांडुरंग बोराडे, चांद पठाण,माऊली वायाळ, निळकंठ मोरे, विनोद खरात, अमोल विरकर,भगवान बोराडे, विष्णू मोरे , अंगद मोरे, पंकज देशमुख, सईद रहीम, पप्पू बोराडे, *(पान २ वर)*

## महानगरपालिकेच्या शाळांना निधी कमी पडू देणार नाही : शिक्षण सभापती भाग्यश्री जोगस

### डिजिटल, अद्ययावत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी मनपाचा निर्धार; विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही जालना महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती सौ. भाग्यश्री सुजितकुमार जोगस यांनी



दिली.
सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी महानगरपालिकेच्या चंदनझिरा येथील मराठी-उर्दू शाळा तसेच नागेवाडी येथील शाळेला भेट देऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वितरणही करण्यात आले.
यावेळी बोलताना शिक्षण सभापती भाग्यश्री जोगस म्हणाल्या की, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना निशुल्क प्रवेश, मोफत शिक्षण, मोफत मध्यान्ह भोजन तसेच विविध शैक्षणिक सुविधा *(पान २ वर)*

## खामखेडा शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत; पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तक वाटप



**दत्ता देशमुख**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खामखेडा येथे विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

**गावातील नागरिक, पालक आणि ग्रामस्थांच्या**

उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात आली. नवीन पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

मुख्याध्यापक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शालेय उपक्रमांमध्ये सहभागाचे महत्त्व सांगितले. सहशिक्षक डोबले व शिंदे यांनीही विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. *(पान २ वर)*

# पँथरचे वाघनखं कापून महापौरपदी बसवले आहे का?

### जालन्याच्या पहिल्या नागरिकांना अधिकारांसह काम करू द्या; वंदना मगरे यांनी स्वतंत्र नेतृत्व सिद्ध करण्याची वेळ

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या महापौरपदी फेब्रुवारी २०२६ मध्ये सौ. वंदना मगरे यांची निवड झाली, तेव्हा शहरवासीयांच्या अपेक्षांना नवे पंख लाभले होते. दिवंगत अरुणराव मगरे यांच्या राजकीय आणि सामाजिक वारशाची परंपरा पुढे नेत शहराच्या विकासाला गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात होती. मात्र चार महिन्यांहून अधिक कालावधी उलटल्यानंतरही महापौरपदाच्या अधिकारांबाबत आणि प्रत्यक्ष कामकाजातील त्यांच्या भूमिकेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.
राजकीय वर्तुळात आणि नागरिकांमध्ये सध्या एकच चर्चा ऐकायला मिळतेमहापौर म्हणून वंदना मगरे यांना खरोखरच स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत का, की त्या केवळ औपचारिक पदावर विराजमान आहेत?
काही नागरिक तर या परिस्थितीचे वर्णन करताना ‘‘पँथरचे वाघनखं कापून त्याला जंगलाचा राजा म्हणण्यासारखे‘‘ असे भाष्य करत आहेत. संघर्षशील प्रतिमा असलेल्या महिला लोकप्रतिनिधीला सर्वोच्च पदावर बसवण्यात आले, पण त्यांना अधिकारांची मुक्त व्याप्ती मिळाली आहे का, हा खरा प्रश्न असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**महापौरपदाची प्रतिष्ठा आणि वास्तव**

महापौर हा महानगरपालिकेचा प्रथम नागरिक असतो. शहराच्या विकासाचा चेहरा, लोकशाही व्यवस्थेतील महत्त्वाचा प्रतिनिधी आणि प्रशासन व जनतेमधील दुवा म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, अतिक्रमण, विकास आराखडा यांसारख्या प्रश्नांवर महापौरांनी ठोस भूमिका घेणे अपेक्षित असते.
परंतु जालना महानगरपालिकेतील सध्याच्या घडामोडींकडे पाहता अनेक महत्त्वाच्या निर्णयांमध्ये महापौरांचे स्वतंत्र नेतृत्व कितपत दिसून येते, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**पडद्यामागे कोण चालवते सूत्रे?**

महानगरपालिकेच्या विविध समित्या, विकासकामांचे प्रस्ताव, प्रशासकीय निर्णय आणि आर्थिक बाबींमध्ये पडद्यामागून काही प्रभावशाली राजकीय व्यक्तींचा हस्तक्षेप असल्याच्या चर्चा शहरात सातत्याने रंगत आहेत. या चर्चांमध्ये तथ्य किती आणि अफवा किती हा वेगळा




विषय असला, तरी अशा चर्चांना वाव मिळत असल्याने महापौरपदाच्या प्रभावाबाबत प्रश्न निर्माण होत आहेत.
नागरिकांचे म्हणणे आहे की, जर सर्व निर्णय इतरत्रच घेतले जात असतील, तर महापौरपदाचे महत्त्व नेमके काय उरते?

**स्वतंत्र नेतृत्वाची प्रतीक्षा**

वंदना मगरे यांची निवड झाल्यानंतर महिला नेतृत्वाला बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. जालना शहराच्या राजकारणात महिलांची प्रभावी उपस्थिती निर्माण होईल, असे चित्र रंगवले गेले होते.
मात्र आतापर्यंत शहरातील अनेक महत्त्वाच्या प्रश्नांवर त्यांची स्वतंत्र भूमिका ठळकपणे पुढे आलेली दिसत नसल्याची भावना काही नागरिक व्यक्त करतात. वाढती अतिक्रमणे, रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याच्या तक्रारी, स्वच्छतेचे प्रश्न, विविध विकासकामांतील विलंब यांसारख्या विषयांवर महापौरांनी अधिक आक्रमक आणि सक्रिय भूमिका घेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अधिकार नसतील तर अधिकारांसाठी लढा**

लोकशाही व्यवस्थेत कोणतेही पद केवळ सन्मानासाठी नसते; त्यामागे जबाबदारी आणि उत्तरदायित्व असते. जर महापौरांच्या अधिकारांवर मर्यादा असतील, तर त्या मर्यादांविरोधात शासन स्तरावर आवाज उठविण्याचे धाडसही लोकप्रतिनिधींनी दाखवले पाहिजे.
नागरिकांचे म्हणणे आहे की, वंदना मगरे यांनी शहराच्या हितासाठी प्रशासनाकडून नियमित आढावा घेणे, निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवणे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. कारण जनतेने त्यांना केवळ पदासाठी नव्हे तर नेतृत्वासाठी निवडले आहे.

**‘‘पँथरला मोकळं मैदान द्या‘‘**

राजकीय विश्लेषकांच्या मते, एखाद्या नेतृत्वक्षम व्यक्तीला सर्वोच्च पदावर बसवून त्याच्या निर्णयक्षमतेवर बंधने आणली गेली, तर त्याचा फटका शहराच्या विकासालाच बसतो. त्यामुळे महापौरांना संपूर्ण अधिकार, स्वायत्तता आणि काम करण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे.
‘‘पँथरला पिंजऱ्यात ठेवून त्याच्याकडून जंगलावर राज्य करण्याची अपेक्षा करता येत नाही. त्याला मोकळे मैदान, अधिकार आणि निर्णयस्वातंत्र्य द्यावे लागते,‘‘
अशी प्रतिक्रिया काही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**जनतेचा सवाल**

आज जालनेकरांचा प्रश्न सरळ आणि स्पष्ट आहे. महापौरपद जर शहराच्या सर्वोच्च लोकप्रतिनिधीचे पद असेल, तर त्या पदाला आवश्यक अधिकार, स्वायत्तता आणि निर्णयक्षमता मिळणार कधी?
आणि जर महापौरांकडे सर्व अधिकार असतील, तर त्या अधिकारांचा प्रभाव शहराच्या कारभारात **स्पष्टपणे दिसणार कधी?**

जालना शहराच्या विकासासाठी राजकीय हस्तक्षेपापेक्षा लोकहिताला प्राधान्य देणारे सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी नेतृत्व उभे राहणे ही काळाची गरज आहे. आता वंदना मगरे यांनी स्वतःची स्वतंत्र कार्यशैली सिद्ध करून या सर्व चर्चांना पूर्णविराम देण्याची वेळ आली असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## संपादकीय...

### स्मार्ट मीटर : आधुनिकीकरणाची क्रांती की ग्राहकांच्या चिंतेचा नवा अध्याय?

राज्यात महावितरणकडून स्मार्ट मीटर बसविण्याची मोहीम वेगाने सुरू झाली आहे. ग्राहकांना ४८ तासांची पूर्वसूचना देऊन पारंपरिक वीज मीटरच्या जागी स्मार्ट मीटर बसविले जात आहेत. सरकार आणि महावितरण याकडे ऊर्जा क्षेत्रातील मोठी डिजिटल क्रांती म्हणून पाहत आहेत. मात्र, दुसरीकडे अनेक ठिकाणी नागरिकांच्या मनात शंका, भीती आणि प्रश्न निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

स्मार्ट मीटरचा मूळ उद्देश नाकारता येणार नाही. अचूक बिलिंग, वीज वापराची रिअल-टाइम माहिती, मानवी हस्तक्षेप कमी करणे, वीज चोरीवर नियंत्रण आणि वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. ग्राहकांना मोबाईल ॲपच्या माध्यमातून स्वतःचा वीज वापर पाहता येणार आहे. भविष्यात वेळेनुसार बदलणारे वीज दर आणि सौरऊर्जेचा अधिक प्रभावी वापर यासाठीही स्मार्ट मीटर उपयुक्त ठरू शकतात. परंतु प्रश्न असा आहे की, या तांत्रिक बदलासाठी ग्राहक मानसिकदृष्ट्या आणि माहितीच्या दृष्टीने तयार आहेत का?

गेल्या काही वर्षांत देशातील विविध राज्यांमध्ये स्मार्ट मीटरच्या अंमलबजावणीदरम्यान अनेक वाद निर्माण झाले आहेत. काही ग्राहकांनी बिल वाढल्याची तक्रार केली, तर काहींनी प्रीपेड प्रणालीमुळे सामान्य कुटुंबांवर अतिरिक्त आर्थिक दबाव येण्याची भीती व्यक्त केली. अनेकदा तांत्रिक बाबींची पुरेशी माहिती नागरिकांपर्यंत पोहोचत नसल्याने अफवा आणि गैरसमज वाढतात.

जालन्यासह राज्यातील अनेक भागांत नागरिक विचारत आहेत की, स्मार्ट मीटर बसल्यानंतर वीज बिल वाढणार का? भविष्यात रिचार्ज संपल्यास वीजपुरवठा तात्काळ खंडित होईल का? मीटरमध्ये बिघाड झाल्यास जबाबदार कोण? ग्रामीण भागात इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्कच्या अडचणी असताना ही व्यवस्था कितपत परिणामकारक ठरेल? या प्रश्नांची स्पष्ट आणि अधिकृत उत्तरे देण्याची जबाबदारी महावितरणवर आहे.

स्मार्ट मीटरचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे डेटा. प्रत्येक ग्राहकाचा वीज वापराचा तपशील डिजिटल स्वरूपात संकलित होणार आहे. त्यामुळे डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेचे प्रश्नही पुढे येऊ शकतात. या माहितीचा वापर कसा होईल, ती किती सुरक्षित राहील आणि ग्राहकांच्या गोपनीयतेचे संरक्षण कसे केले जाईल, याबाबतही पारदर्शकता आवश्यक आहे.

योजनेचे समर्थक म्हणतात की, स्मार्ट मीटरमुळे चुकीची बिले, अंदाजे रीडिंग आणि वाद कमी होतील. तर विरोधकांचे म्हणणे आहे की, ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याशिवाय अशा मोठ्या बदलांची अंमलबजावणी केल्यास विरोध निर्माण होऊ शकतो. त्यामुळे केवळ मीटर बदलणे पुरेसे नाही; जनजागृती, प्रात्यक्षिके, तांत्रिक मार्गदर्शन आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे तितकेच आवश्यक आहे.

खरे तर प्रश्न स्मार्ट मीटरचा नाही, तर विश्वासाचा आहे. जर ही प्रणाली ग्राहकांना अधिक सुविधा, पारदर्शकता आणि बचत देणार असेल तर नागरिक नक्कीच तिचे स्वागत करतील. परंतु त्यासाठी महावितरणने प्रत्येक शंकेचे समाधान करणे, सर्व माहिती खुल्या पद्धतीने देणे आणि तक्रारींवर तत्पर प्रतिसाद देणे गरजेचे आहे.

ऊर्जा क्षेत्राच्या आधुनिकीकरणाचा प्रवास अपरिहार्य आहे. मात्र कोणतीही तांत्रिक क्रांती तेव्हाच यशस्वी ठरते, जेव्हा ती जनतेच्या विश्वासासह पुढे जाते. स्मार्ट मीटर योजना हा बदलाचा नवा अध्याय ठरू शकतो; पण तो यशस्वी होईल की वादग्रस्त, हे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर आणि ग्राहकांच्या अनुभवावर अवलंबून असेल.

## एकल महिला धोरणासाठी शासनाकडून सूचना मागविण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र ''एकल महिला धोरण'' तयार करीत असून हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक करण्यासाठी राज्यभरातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, संशोधक आणि विषयतज्ञ यांच्याकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

महिला व बाल विकास विभागामार्फत तयार करण्यात येत असलेल्या या धोरणाच्या माध्यमातून एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कायदेशीर सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजनांचा विचार करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने सर्व संबंधित घटकांना धोरण निर्मिती प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले आहे. याकरीता आपल्या सूचना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ८२०८५८९१९५ या अधिकृत व्हॉट्सॲप क्रमांकावर आपले अभिप्राय पाठवावेत. केवळ एकल महिलांच्या समस्या मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना कराव्यात, कोणत्या नवीन योजना सुरू कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, तसेच गरज भासल्यास कोणत्या कायदे किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात याबाबत सविस्तर सूचना पाठवाव्यात. सूचना पाठविताना केवळ त्रोटक मते न देता संबंधित विषयाची पार्श्वभूमी, प्रस्तावित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी, अपेक्षित परिणाम तसेच धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक बाबींचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करताना योग्य तो विचार करण्यात येणार असल्याचे महिला व बाल विकास विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ञ यांनी या महत्त्वपूर्ण उपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास कल्याण अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत

शिक्षणाची भाषा कोणती असावी यावर आपल्याकडे गेली अनेक वर्ष विचारमंथन सुरू आहे. केवळ समाजातच नव्हे तर घराघरांत यावर चर्चा सुरू आहे. चर्चा कसली वाद विवादच म्हणा कारण आईवडील, नातेवाईक, शेजारीपाजारी या सर्वांमध्ये याबाबत मतभिन्नता आढळते. शिक्षणासाठी कोणते माध्यम वापरावे याबाबत तर्कशास्त्र वापरले जात नसल्याने मध्यमवर्गीय आणि निम्नमध्यमवर्गीयांचा गोंधळ उडतो. विशेषतः इंग्रजी माध्यमांच्या शाळा जशा वाढू लागल्या तसा हा गोंधळ जास्त होऊ लागला. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून सर्वसामान्य माणूसही आपल्या पाल्याला इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करू लागला. पूर्वी शहरी भागापूरते असणारे हे लोण आता ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील गरीब, कष्टकरी पालक कर्ज काढून उधार उसनवारी करून लाखो रुपयांच्या देणग्या भरून आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल करीत आहेत. मुळात इंग्रजी शिकणे आणि इंग्रजी माध्यम शिक्षण म्हणून निवडणे यात पालकांची गल्लत होते. इंग्रजी शिकण्यासाठी इंग्रजी माध्यम निवडणे खरेच गरजेचे आहे का? इंग्रजी शिकण्यासाठी संपूर्ण शिक्षणच इंग्रजीतून घेणे योग्य आहे का? याचा विचार पालक करत नाहीत. मातृभाषेतून शिक्षण घेऊनही चांगले इंग्रजी शिकता येते हेच पालक विसरत चालले आहे. मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची नैसर्गिक पद्धत आहे. मातृभाषा ही खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा आहे. ती भाषा मुलाला तो आईच्या पोटात असल्यापासून ऐकायला मिळते. मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने मुलाची मानसिक वाढ परिपूर्ण होते कारण ते मूल ज्या वातावरणाचा भाग आहे त्या वातावरणाचे प्रतिबिंब त्याला मातृभाषेत दिसते त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण हीच शिकण्याची आदर्श पद्धत आहे. सांस्कृतिक, सामाजिक मूल्यांची रुजवन फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात माय, माती, मातृभाषा आणि मातृभूमी यांचे अनन्यसाधारण महत्व असते. माय जन्म देते, माती भरण पोषण करते, मातृभूमी आसरा सुरक्षा देते आणि मातृभाषा योग्य संस्कार करते. या संस्काराच्या शिदोरीवरच प्रत्येक व्यक्तीचे जीवन सुखी व समृद्ध होते. म्हणून किमान प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवर तरी शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा असली पाहिजे असे अनेक भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील संस्था ओरडून सांगत आहेत. सुरवातीला एकदा मातृभाषेतून मूलभूत शिक्षण घेतल्यावर नंतर इंग्रजी अथवा इतर परकीय भाषा गरजेनुसार आत्मसात करणे, त्यांचा काळ परिस्थितीनुसार वापर करणे यास कोणाचीही काहीही हरकत असण्याचे कारण नाही. शिक्षण प्रणालीतून असे शिक्षण दिले पाहिजे की शिक्षण घेऊन बाहेर पडेल त्याला तो राहत असलेल्या प्रदेशातील पर्यावरणाची जाणीव असेल, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय जबाबदारीचे त्याला भान असेल देशाला भेडसावणाऱ्या समस्या व आव्हाने ओळखून त्याचा सामना करण्यास तो समर्थ असेल. युनेस्को ही युनोची शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी उपसंस्था आहे. युनेस्कोने केलेल्या संशोधनातून मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची आकलनशक्ती व गुणवत्ता ही मातृभाषेतर माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी चांगली व सरस असते असे आढळून आले आहे. महात्मा गांधी म्हणतात मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे. मातृभाषेतूनच मुलांचा भावनिक आणि सामाजिक विकास होऊ शकतो. सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची पेरणी फक्त मातृभाषेतूनच होऊ शकते. जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ अनिल काकोडकर म्हणतात, मातृभाषाच मुलांच्या स्वाभाविक शिक्षणाचे माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. इंग्रजी माध्यमाचा विचार केला तर इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. इंग्रजीवर प्रभुत्व मिळवलेल्या मुलांना सर्वच क्षेत्रात संधी उपलब्ध होईल असे पालकांना वाटते म्हणून पालक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना घालत असतील असे जरी मान्य केले तरी इंग्रजी माध्यमांच्या शाळेतून शिकलेले सर्वच मुले यशस्वी होतात असेही नाही. उलट आज जे उच्चपदावर पोहचलेले मान्यवर आहेत मग ते डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शिक्षक, प्राध्यापक, साहित्यिक असोत की शास्त्रज्ञ, उद्योजक, नेते, अभिनेते सर्वच मराठी भाषेतून शिकलेले आहेत. आयएएस,आयपीएस, आयएफएस यांची जर यादी पाहिली तर त्यातील ९५ टक्के अधिकाऱ्यांचे शिक्षण मातृभाषेतूनच झाले आहे. मागील काही वर्षात स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक संख्या मातृभाषेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचीच आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रांस, जर्मनी, चीन, जपान, रशिया यासारख्या प्रगत देशातही मातृभाषेतूनच शिक्षण दिले जाते. या देशातील पालक जाणीवपूर्वक आपल्या मुलांना मातृभाषेतून शिक्षण देतात. फिनलँड सारखा देश की ज्या देशाच्या शिक्षण पद्धतीचे अनुकरण प्रगत राष्ट्रही करतात त्या देशातही मातृभाषेतून शिक्षण दिले जाते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर मुलांना इंग्रजीचे डोस पाजले तर इथला मराठी भाषेचा समृद्ध ठेवा लुप्त होईल. मुलांमध्ये, राष्ट्राभिमान, राष्ट्रीय एकात्मता, चांगल्या संस्काराचे रोपण करायला मातृभाषाच कामी येईल. शिक्षणात मातृभाषेमुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. मातृभाषा ही संस्काराचा आणि संस्कृतीचा मानबिंदू आहे. जितक्या सहजतेने मूल मातृभाषेतून शिकते तितक्या सहजतेने इंग्रजीतून शिकत नाही म्हणून मातृभाषेतून शिक्षण हेच खरे शिक्षण आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

पान १ व ४ वरुन....

### दुधना नदीपात्रातील...

उपसा करून ती वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक तसेच अप्पर पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तात्काळ कारवाईचे आदेश दिले.

**नदीपात्रात सुरू होता अवैध वाळू उपसा**

एलसीबीचे पथक घटनास्थळी पोहोचले असता काळेगाव येथील दुधना नदीपात्रात जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. तसेच वाळू वाहतुकीसाठी दोन हायवा ट्रकही तेथे उभे असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तातडीने छापा टाकून संबंधित वाहने व आरोपींना ताब्यात घेतले.

या कारवाईत नदीपात्रातील अवैध उत्खनन थांबविण्यात आले असून वाळू माफियांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

**आरोपी व जप्त मुद्देमाल**

कारवाईदरम्यान पोलिसांनी खालील आरोपींना ताब्यात घेतले आहे :१) अनुज दिलीप कावळे (वय २० वर्षे, रा. गोलापांगरी, ता. जालना) याच्या ताब्यातून सुमारे १० लाख रुपये किमतीची जेसीबी मशीन (क्रमांक -१७--८८२६) जप्त करण्यात आली.

२) अभिषेक छत्रभुज कावळे (वय १९ वर्षे, रा. गोलापांगरी, ता. जालना) याच्या ताब्यातून २० लाख रुपये किमतीचा रिकामा हायवा ट्रक (क्रमांक -०४--६६२०) जप्त करण्यात आला.

३) अमोल शिवनाथ जिंगे (वय ३३ वर्षे, रा. मठपिंपळगाव, ता. अंबड) याच्या ताब्यातून २० लाख रुपये किमतीचा हायवा ट्रक (क्रमांक -२०--७२७७) आणि त्यामधील २० हजार रुपये किमतीची ४ ब्रास अवैध वाळू जप्त करण्यात आली.

या सर्व मिळून ५० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. गुन्हा दाखल या प्रकरणी तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६४/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता () कलम ३०३(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

सदर कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. आनंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक श्री. राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार भोजने, करतारे, पवार आणि इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

**अवैध वाळू माफियांविरुद्ध कारवाईचा इशारा**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खननामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत असून नदीपात्रांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध पोलीस प्रशासनाने धडक मोहीम सुरू ठेवली असून भविष्यातही अवैध वाळू उपसा, वाहतूक व साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

या कारवाईमुळे जिल्ह्यातील वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली असून अवैध उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### कार्यकर्त्यांच्या एकजुटीतून...

विष्णुपंत खराबे, ओमकार सस्ते, जयदेव चव्हाण, संतोष देवकर, इद्रिस कुरेशी, डॉक्टर संतोष पवार, सतीश वायाळ, नाथा दिवटे, व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### महानगरपालिकेच्या....

उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आगामी काळात या शाळांना अत्याधुनिक डिजिटल स्कूलच्या स्वरूपात विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

त्यासाठी शाळांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, संगणक प्रयोगशाळा, डिजिटल कीबोर्ड, अद्ययावत वर्गखोल्या, सुसज्ज स्वच्छतागृहे तसेच विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**बाल हक्क आयोगाच्या सूचनांनुसार उपाययोजना**

बाल हक्क आयोगाच्या पत्र व नोटीस संदर्भात भूमिका स्पष्ट करताना जोगस यांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे. यामध्ये खेळणी साहित्य, संरक्षण भिंत (वॉल कंपाऊंड), इमारतींची छत दुरुस्ती, नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, विद्यार्थ्यांसाठी नवीन बेंच, सुधारित स्वच्छतागृहे, किचन शेड आणि इतर मूलभूत सुविधांचा समावेश आहे.

''शिक्षणाशी संबंधित कोणतेही काम निधीअभावी रखडणार नाही. विद्यार्थ्यांच्या हिताच्या सर्व कामांची तातडीने अंमलबजावणी केली जाईल,'' असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

**विद्यार्थीसंख्या वाढविण्यावर भर**

महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता वाढवून अधिकाधिक पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश या शाळांमध्ये घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना त्यांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकांना दिल्या. आगामी काळात मनपाच्या शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**पालकांना आवाहन**

जालना शहरातील पालकांनी आपल्या मुलांचा महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश घ्यावा, असे आवाहन करताना जोगस म्हणाल्या की, येथे प्रवेश पूर्णतः निशुल्क असून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, मोफत मध्यान्ह भोजन आणि विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच सर्वसामान्य कुटुंबांसाठी महानगरपालिकेच्या शाळा हा एक उत्तम पर्याय ठरत आहेत.

यावेळी चंदनझिरा शाळेचे मुख्याध्यापक श्री. राठोड, सर्व शिक्षकवृंद तसेच नागेवाडी शाळेचे मुख्याध्यापक श्री. जाधव आणि शिक्षक उपस्थित होते.

### खामखेडा शाळेत...

कार्यक्रमास पोलीस पाटील शाहरुख पठान, प्रकाश फदाट, योगेश फदाट, नितीन जाधव, प्रदीप सुसर, जगन फदाट तसेच पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह आणि सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

### प्रशासनाच्या दिरंगाई...

सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था राखली जावी, यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.आंदोलनकर्ते तहसील कार्यालयावर पोहोचल्यानंतर जाफराबादचे तहसीलदार अविनाश लोंढे यांनी आंदोलनस्थळी येऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली व त्यांच्या मागण्यांचे निवेदन स्वीकारले.यावेळी प्रशासनाच्या वतीने सकारात्मक पावले उचलण्याचे आणि मागण्यांची दखल घेण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांकडून देण्यात आले. ''आता सहन करायचे नाही, तर जाब विचारायचा!'' अशी भूमिका घेत नागरिकांनी न्याय मिळेपर्यंत प्रशासकीय कामकाजावर लक्ष ठेवण्याचा इशारा दिला आहे. पोलीसांच्या चोख बंदोबस्तात आंदोलन पूर्णपणे शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. यावेळी सुरेश गवळी, कुंडलिक पा मुठ्ठे ,देविदास पैठणे, राजु मगरे, कृष्णा माकोडे,आनंद वाहुळे, रमेश फदाट, बबन फदाट, मोतीराम फदाट, कृष्णा फदाट, सुनील फदाट , दिलीप खंदारे, राहुल फदाट, कृष्णा फदाट,दिलीप कुटुंबरे, हर्षल फदाट,विठ्ठल चव्हाण, राजू घाडगे , दत्ता मुळे, राजू चव्हाण , विष्णू काकडे, शुभम कराडे,राजु काकडे, मोहन शेळके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बसस्थानक परिसरात....

वसुली केली जात असल्याच्या तक्रारीही वारंवार समोर येत आहेत. त्यामुळे अवैध प्रवासी वाहतुकीला अप्रत्यक्षपणे अभय मिळत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रस्ते व शहर वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी नियमित गस्त, तपासणी व प्रभावी कारवाई केली असती तर अशी परिस्थिती निर्माण झाली नसती, असेही नागरिकांचे म्हणणे आहे.

कारवाईच्या दिवशी काही वाहनांवर दंडात्मक कारवाई झाली असली तरी अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न केवळ एक-दोन दिवसांच्या मोहिमेने सुटणार नसून सातत्यपूर्ण कारवाईची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे. बसस्थानक परिसरासह शहरातील प्रमुख मार्गांवर नियमित तपासणी मोहीम राबवून अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. ही मोहीम राज्य परिवहन महामंडळ, जालना विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. प्रशासनाने आगामी काळातही अशाच धडक मोहिमा सुरू ठेवून अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान परिवहन विभागाचे सुरक्षा दक्षता अधिकारी रवींद्र जाधव, सज्जनसिंग जारवाल व शहर वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांनी केली.

### राजूर गणपतीसाठी...

विधानसभेचे आमदार नारायणराव कुचे व विभाग नियंत्रक परिवहन महामंडळ प्रमोद नेहुल छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे मागणी केली होती शालेय विद्यार्थी व जेष्ठ नागरिकांची दखल घेऊन छत्रपती संभाजीनगर ते राजुर गणपती साठी राजमाता जिजाऊ बस सेवा सुरू केल्यामुळे आ. अनुराधाताई चव्हाण, आ. नारायणराव कुचे व परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.

### बालविकास शाळेत...

शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### एफडीएतील...

संबंधित अधिकारी शहरातील एकाद्या हॉटेलमध्ये भोजनासाठी थांबतात. जेवणावर ताव मारल्यानंतर जालना शहराकडे रवाना होतात. या चर्चेची अधिकृत पुष्टी झालेली नसली तरी नागरिकांमध्ये याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. विशेष म्हणजे, राज्यभर एफडीएच्या कारवायांमुळे भेसळखोरांमध्ये धास्ती निर्माण होत असताना, जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी आपल्या कारवाईची माहिती पारदर्शकपणे जनतेसमोर मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तपासणी झाली असल्यास किती आस्थापनांची पाहणी करण्यात आली, किती नमुने घेण्यात आले आणि त्यांचे अहवाल कधी येणार, याची माहिती सार्वजनिक करण्याची मागणीही होत आहे.

याशिवाय, काही पत्रकारांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही अधिकाऱ्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रशासन आणि माध्यमांमधील संवादाचा अभाव असल्यास अफवा आणि चर्चांना खतपाणी मिळते, असे मत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केले आहे.

नागरिकांचे आरोग्य आणि अन्न सुरक्षा हा अत्यंत संवेदनशील विषय असल्याने एफडीएने तपासणी कारवायांमध्ये अधिक पारदर्शकता ठेवणे आवश्यक असल्याचे मत जाणकारांकडून व्यक्त होत आहे. तपासणीचे निष्कर्ष समोर आल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार असली तरी सध्या मंठा शहरात जालना एफडीएच्या 'गुपचुप तपासणी'ची चर्चा चांगलीच रंगली आहे.

### टेंभुर्णीच्या डॉ...

सुरेश बोर्डे, प्रदीप मुळे, , अलकेश सोमानी, भिकनखा पठाण, संतोष शिंदे, भागाजी वाघमारे, सुनील अंभोरे, संजय निकम, बालाजी मगर, दत्तू मुनेमाणिक, प्रा. शैलीप्रकाश वाघमारे, ज्ञानेश्वर उखर्डे, मुरली कुमकर सेवानिवृत्त फौजी रामू जंगले, शेख साबेर, फकरू कुरेशी, शकील तडवी, शेख सैफ, फवाज कुरेशी, शेख नजमोद्दीन आदींची उपस्थिती होती.

फोटो - एमबीबीएस पदवी शिक्षण प्रथम श्रेणी पूर्ण केल्याबद्दल टेंभुर्णी येथील डॉ. अथर्व मुळे व डॉ. अनिकेत बोर्डे यांचा सत्कार करताना मानव सेवा मंडळाचे पदाधिकारी.

### जालना एलसीबीची...

आली असता आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. चौकशीदरम्यान त्याने तीन वर्षांपूर्वी पुणे जिल्ह्यातील भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हिरो होंडा कंपनीची फॅशन मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली.

सदर मोटारसायकल (क्रमांक -१४--७९४८) ही भोसरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ५४९/२०२३, कलम ३७९ भारतीय दंड संहिता () अंतर्गत नोंद असलेल्या वाहनचोरी प्रकरणातील असल्याचे तपासात स्पष्ट झाले. पोलिसांनी ही मोटारसायकलही जप्त करून ताब्यात घेतली.

**दोन्ही वाहने अंबड पोलीस ठाण्यात जमा**

जप्त करण्यात आलेल्या दोन्ही मोटारसायकली पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी अंबड पोलीस ठाण्यात जमा करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे दोन वेगवेगळ्या वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा उलगडा झाला असून चोरीस गेलेली वाहने त्यांच्या मालकांना परत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**वाहनचोरांविरोधात पोलिसांची मोहीम सुरूच**

जालना जिल्ह्यात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेकडून सातत्याने शोधमोहीम राबविण्यात येत आहे. गोपनीय माहितीचे जाळे, तांत्रिक तपास आणि स्थानिक पातळीवरील पडताळणीच्या आधारे अनेक गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश येत आहे. सदर कारवाईमुळे वाहनचोरी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा गुन्ह्यांविरोधात कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.

# जनगणना २०२७ च्या कामात कर्मचाऱ्यांचा जीव धोक्यात? केंद्र सरकारचा हात झटकणारा आरटीआय खुलासा; राज्य शासनाकडे विशेष विम्याची मागणी

## दुसऱ्या टप्प्यात विमा संरक्षणाशिवाय एकही प्रगणक किंवा पर्यवेक्षक काम करणार नाही, याची नोंद घ्यावी - शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**
देशात सध्या सुरू असलेल्या जनगणना २०२७ ( २०२७) च्या पहिल्या टप्प्यातील राष्ट्रीय कर्तव्यावर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेबाबत एक अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक वस्तुस्थिती माहिती अधिकारातून () समोर आली आहे. जनगणनेच्या कामातील लाखो कर्मचाऱ्यांना सुरक्षेची कोणतीही केंद्रीय हमी नसून, केंद्र सरकारने विम्यासंदर्भात आपले हात झटकले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील प्रगणक () व पर्यवेक्षकांना () ५० लाखांचे विशेष विमा संरक्षण, सानुग्रह नुकसानभरपाई आणि कॅशलेस वैद्यकीय सुविधा लागू कराव्यात, अशी जोरदार मागणी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन आणि हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनच्या वतीने शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव आणि मुख्य जनगणना अधिकाऱ्यांना मुंबई येथे थेट निवेदन देण्यात आले आहे.

**केंद्र सरकारचा धक्कादायक खुलासा**
भारत सरकारच्या गृह मंत्रालयांतर्गत रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया () यांच्याकडे माहिती अधिकारात (संदर्भ क्र. ///२६/००३९४, दि. ०९/०६/२०२६) विनायक चौथे यांनी विचारणा केली होती. यावर केंद्र सरकारने दिलेल्या अधिकृत उत्तरात स्पष्ट केले आहे की:
''जनगणनेसाठी नियुक्त केलेले प्रगणक व पर्यवेक्षक हे प्रामुख्याने राज्य शासनाचे कर्मचारी असतात. त्यांच्या विमा संरक्षण, सानुग्रह अनुदान किंवा वैद्यकीय भत्त्यांची कोणतीही स्वतंत्र तरतूद किंवा मार्गदर्शक तत्त्वे केंद्र सरकारकडे उपलब्ध नाहीत. ही संपूर्ण जबाबदारी संबंधित राज्य सरकार आणि त्यांच्या मूळ विभागाच्या धोरणावरच अवलंबून राहील.''
या खुलाशामुळे क्षेत्रीय पातळीवर भरउन्हात, दुर्गम भागात जीवाची बाजी लावून काम करणाऱ्या लाखो शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जनगणनेच्या घर गणना ( ) या प्रथम टप्प्यात महाराष्ट्रभरातील अनेक शिक्षक व शिक्षिकांना आपला जीव गमवावा लागल्याच्या बातम्या विविध वर्तमानपत्रांमधून समोर आल्या आहेत. काही शिक्षक अतिताण व कामाच्या प्रचंड दबावामुळे मृत्यू पावले,तर काही जण शिक्षक जनगणनाच्या मानसिक तणावामुळे हृदयविकाराने, तर काही जनगणनेच्या कर्तव्यावर जात असताना उन्हाच्या



उष्णतेच्या लाटेमुळे, तर काही शिक्षक जनगणनेसाठी जात असताना रोड अपघातांमध्ये मृत्युमुखी पडले आहेत. या दुर्दैवी घटनांमुळे त्यांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून अनेक कुटुंबांची आर्थिक व सामाजिक घडी विस्कळीत झाली आहे.
विशेष म्हणजे, शिक्षकांनी आपल्या नियमित शैक्षणिक जबाबदाऱ्यांसोबत सुट्टीच्या काळातही राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेचे काम प्रामाणिकपणे पार पाडले, तरी अशा दुर्घटनांच्या प्रसंगी त्यांच्यासाठी कोणतीही विशेष संरक्षणात्मक यंत्रणा किंवा हमी उपलब्ध नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जनगणना कार्यात सहभागी होणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी विशेष संरक्षण विमा, अपघाती मृत्यू व अपंगत्व भरपाई, तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक आर्थिक सहाय्याची स्वतंत्र व प्रभावी तरतूद शासनाने तातडीने करावी, अशी रास्त व न्याय्य मागणी शिक्षक वर्गातून व्यक्त होत आहे.

**...तर तीव्र असंतोष निर्माण होणार: संघटनेचा इशारा**
निवेदनात म्हटले आहे की, जनगणनेचे काम हे अत्यंत क्लिष्ट, कठीण आणि पूर्णतः क्षेत्रीय ( ) स्वरूपाचे असते. दुर्गम भागात फिरताना अपघात होणे, गंभीर आजारपण उद्भवणे किंवा उष्माघाताचा त्रास होण्याचा मोठा धोका असतो. केंद्र सरकारकडे यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद नसल्याने, आता महाराष्ट्र सरकारने स्वतः पुढाकार घेऊन कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची कायदेशीर आणि नैतिक जबाबदारी घेणे बंधनकारक आहे. जर शासनाने तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण होईल, असा इशारा संघटनेने दिला आहे...

**संघटनेच्या प्रमुख ४ मागण्या:**
५० लाखांचे विशेष विमा संरक्षण: जनगणनेच्या कामावरील प्रत्येक कर्मचाऱ्याला कर्तव्याच्या कालावधीसाठी किमान ५० लाख रुपयांचा अपघाती व जीवन विमा लागू करावा.
सानुग्रह नुकसानभरपाई (-): कर्तव्य बजावताना दुर्दैवी मृत्यू झाल्यास कुटुंबाला त्वरित आर्थिक मदत द्यावी, तसेच अपंगत्व आल्यास सढळ हस्ते मदत करावी.
कॅशलेस वैद्यकीय उपचार: क्षेत्रीय काम करताना अपघात किंवा आजारपण उद्भवल्यास राज्यातील सर्व सूचीबद्ध () रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचारांची सुविधा द्यावी.
विशेष भत्ते आणि रजा: उन्हाळ्यातील कामासाठी विशेष उष्माघात प्रतिबंधक किट ( ) द्यावी. तसेच कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त आणि सुट्ट्यांच्या दिवशी काम करावे लागत असल्याने अतिरिक्त अर्जित रजा ( ) मंजूर करावी.
'लाखो कर्मचाऱ्यांना सुरक्षेची कोणतीही हमी न देता अशा जोखमीच्या कामावर पाठवणे अत्यंत अन्यायकारक आहे. राज्य सरकारने तातडीने उच्चस्तरीय बैठक घेऊन यासंदर्भात स्वतंत्र शासन निर्णय () जारी करावा. कारण राज्यात जवळपास ८ शिक्षकांचा जनगणनेच्या कामादरम्यान मृत्यू झाला आहे. पुढील टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार आहे, त्याआधी स्वयंस्पष्ट शासन निर्णय निघाला नाही, तर पुढील कामावर सर्व प्रगणक व पर्यवेक्षक बहिष्कार घालतील, याची नोंद घेण्यात यावी.''

**शेख अब्दुल रहीम**
**(राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन तथा संस्थापक अध्यक्ष, हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन)**

# नरमुद्रा चित्रपटाचे लेखक डॉ. निलेश पगारे यांचा उद्वेग

## मराठी सिनेसृष्टी कलेचे नाही तर पैशांचे साधन बनलीये

**जालना - प्रतिनिधी**
''सध्याच्या काळात मराठी सिनेसृष्टी ही कलेचे माध्यम न राहता केवळ पैशांचे साधन बनली आहे,'' असा संतप्त आणि क्लेशदायक अनुभव नरमुद्रा या चित्रपटाचे लेखक डॉ. निलेश पगारे यांनी मांडला आहे. चित्रपटसृष्टीतील याच व्यावसायिक आणि उदासीन वृत्तीला कंटाळून त्यांनी आपला महत्त्वाकांक्षी नरमुद्रा हा चित्रपट कायमचा बंद करण्याचा अत्यंत धाडसी व दुर्दैवी निर्णय घेतला आहे. डॉ. निलेश पगारे यांनी तब्बल ८० वर्षांपूर्वी घडलेल्या एका सत्य घटनेवर आधारित बायोपिक (चरित्रपट) लिहिण्याचा विडा उचलला होता. संपूर्ण पुराव्यानिशी या चित्रपटाचे लेखन पूर्ण करण्यासाठी त्यांना २ वर्षांचा प्रदीर्घ काळ लागला. या कथेचे कायदेशीर राईट्स (हक्क) मिळवल्यानंतर त्यांनी चित्रपट निर्मितीसाठी निर्मात्यांचा शोध सुरू केला. मात्र, या प्रवासात त्यांना सिनेसृष्टीचा एक वेगळाच आणि कटू चेहरा पाहायला मिळाला. सैराटच्या यशानंतर चित्रपटसृष्टीची गणितं बदलली आपला अनुभव सांगताना डॉ. पगारे म्हणाले की, ''कित्येक हौसी निर्माते हॉटेल्समध्ये भेटीला यायचे. चित्रपटाची कथा त्यांना आवडायची, मात्र बजेट ऐकून आणि एकाचे दोन होतील का? या विचाराने ते माघार घ्यायचे.'' सैराट चित्रपटाच्या अफाट यशानंतर मराठी सिनेसृष्टी बॉक्स ऑफिसच्या गणितांमध्ये अडकली असून, यामुळे इतर दर्जेदार कलाकृती संपुष्टात येतं असल्याचा आरोप त्यांनी केला. निर्मात्यांनंतर त्यांनी सिनेसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार आणि दिग्दर्शकांच्या भेटी घेतल्या. जिथे कमी तिथे आम्ही असं भाष्य करणार्या राजकिय नेत्यांच्याही घरी धाव घेतली मात्र, ''हे सगळेजण केवळ पैशांच्या आहारी गेल्याचे मला जाणवले आणि हाच आजच्या सिनेसृष्टीचा खरा चेहरा आहे,'' असा रोकठोक उद्गार डॉ. पगारे यांनी केला. आपल्या या संघर्षात मुंबई, पुणे, नाशिक, बीड, आणि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांसारखी अनेक शहरे पालथी घालूनही त्यांच्या हाती केवळ अपयश आले. ''मी या मुलाखतीत सिनेसृष्टीतील कोणत्याही दिग्गजाचे किंवा राजकीय नेत्याचे नाव घेणार नाही; अन्यथा ही सामाजिक व सिनेसृष्टीची दमकोंडी ठरेल, यामुळे उरलेली नातीही संपवून जातील,'' अशी खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. या दरम्यान, एका हौशी दिग्दर्शकाने या कथेवर चित्रपट ऐवजी मालिका (सीरिअल) बनवण्याचा प्रस्ताव डॉ. पगारे यांच्यासमोर ठेवला होता. त्यासाठी योग्य रक्कम देण्याचीही त्यांची तयारी होती. परंतु, डॉ. पगारे यांनी हा प्रस्तावाला मनमुरादी नकार सुनावला.
''ज्या जिवंत लोकांसाठी मला हे स्वप्न रुपेरी पडद्यावर उतरवायचे होते, तेच लोक जर सभोवताली नसतील, तर हे यश माझ्या अपयशाचे कारण ठरेल. पैशांसाठी तडजोड केली, तर मी एक कलाकार म्हणून माझं स्वतःचं अस्तित्व गमावून बसेन,'' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.
अखेर, सिनेसृष्टीतील या पैशांच्या हव्यासाला आणि व्यावसायिकतेला बळी न पडता, स्वतःच्या तत्त्वांशी प्रामाणिक राहत डॉ. निलेश पगारे यांनी नरमुद्रा हा चित्रपट कायमचा बंद पाडत असल्याचे जाहीर केले आहे. त्यांच्या या निर्णयामुळे एका चांगल्या विषयावरील कलाकृती पडद्यावर येण्यापूर्वीच पडद्याआड गेल्याने चोखंदळ सिनेप्रेमींमधून हळहळ व्यक्त होत आहे.

# दिव्यांगाचा राखीव पाच टक्के निधी खात्यावर वर्ग करा-तनपुरे

**परतूर - प्रतिनिधी**
जिल्ह्यातील काही ग्रामपंचायती , नगरपरिषद, नगरपंचायत,
३१ मार्च होऊन सुद्धा ही अद्यापही राखीव पाच टक्के निधी दिव्यांगाच्या खात्यात वर्ग करण्यात आलेला नाही. ,नगरपरिषद, नगरपंचायत ,ग्रामपंचायत, यांनी विकास कामातून दिव्यांगासाठी पाच टक्के निधी राखीव असतो हा निधी ३१ मार्चपर्यंत दिव्यांगाच्या खात्यात वर्ग करण्यात आला नाही.
दिव्यांग कल्याण आयुक्तालयाचे आदेश असताना सुद्धा जिल्ह्यातील काही ग्रामपंचायती सोडून पाच टक्के हा निधी अध्यापही वाटप केलेला नाही
निधी वाटप करण्यासाठी वेळोवेळी लेखी निवेदन देऊन सुद्धा दिव्यांगाकडे दुर्लक्ष करीत असून काही ग्रामपंचायत मध्ये हा निधी पडून आहे.परंतू तो वाटप करण्यासाठी प्रशासनाने आदेशित करावे नाहीतर जिल्ह्यातील दिव्यांग बांधव जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, या ठिकाणी आंदोलन करण्यात येईल प्रशासनाने याची नोंद घ्यावी. अशी टोकाची भूमिका प्रहार संघटना जालना,अशोक तनपुरे यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे.

# शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**
समाज कल्याण विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह जालना, भोकरदन, अंबड, बदनापुर, घनसावंगी, संत रामदास शासकीय वसतिगृह, जालना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, जालना, अंबड, मंठा, भोकरदन या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. त्यामुळे गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. शालेय विद्यार्थ्यांनी दिनांक ३० जुन, २०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. तर इयत्ता ११ वी आणि बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी दिनांक १५ जुलै २०२६ ही अर्ज करण्याची शेवटची तारीख असेल. सन २०२६-२७ साठी खालील प्रमाणे वसतिगृहामध्ये रिक्त जागा आहेत. यामध्ये संत रामदास शासकीय वसतिगृह, जालना, मान्य संख्या ७५ असुन रिक्त जागा ३० आहेत. तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, जालना मान्य संख्या ७५ रिक्त जागा २४, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, जालना मान्य संख्या ८० रिक्त जागा २०, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, घनसावंगी मान्य संख्या १०० रिक्त जागा ३८, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, अंबड मान्य संख्या ७५ रिक्त जागा २०, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, अंबड मान्य संख्या ७५ रिक्त जागा २१, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, भोकरदन मान्य संख्या ७५ रिक्त जागा ३२, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह भोकरदन मान्य संख्या १०० रिक्त जागा ३३, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बदनापुर मान्य संख्या १००रिक्त जागा ३१, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, मंठा मान्य संख्या १०० रिक्त जागा ३३ असे एकुण ८५५ मान्य संख्या असुन २८२ रिक्त जागा आहेत. यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, अनाथ, दिव्यांग, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गसह इतर प्रवर्गाच्या इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामुल्य प्रवेश ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तेनुसार देण्यात येणार आहे.

# विनाअट सरसकट कर्जमाफी करा -रामधन कळल

## तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन


**दत्ता देशमुख**
शेतकऱ्यांसाठी सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असून, या योजनेतील जाचक अटी, शर्ती बघता ही योजना म्हणजे कर्जमाफी नसून कर्जवसुली आहे की काय ? असा प्रश्न राज्यातील शेतकऱ्यांना पडला आहे. तर यामुळे राज्यभरातील लाखो शेतकरी वंचित राहणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे. संबंधित शासन निर्णय बदलण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष जाफराबाद तालुक्याच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, कर्जमाफी योजनेत २०१९ ते २०२६ दरम्यान शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या महात्मा जोतिराव फले कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे. त्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार
रुपयांची कर्जमाफी मिळणार आहे. २०१९ साली राज्यातील ३३ लाख शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा लाभघेतला होता. याचाच अर्थ यंदाच्या कर्जमाफीतून या ३३ लाख शेतकऱ्यांना संपूर्ण लाभ मिळणार नाही. या योजनेत ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाखांहून अधिक आहे. त्यांनी एकवेळ समझोताअंतर्गत २ लाखांवरील रक्कम भरली तरच त्यांना २ लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांनी २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतला आहे. आणि सध्या त्यांचे कर्ज ५० हजारांहून अधिक आहे. त्यांनी उर्वरित रक्कम भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. या योजनेतील अटीनुसार ज्या शेतकऱ्यांनी २०२२- २३ व २४-२५ यापैकी कोणत्याही दोन वर्षांतील पीक कर्जाची वेळेत परतफेड केली असेल त्यांना ५० हजार रुपये



प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. परंतु, हा प्रोत्साहनपर लाभ मिळण्यासाठी त्या शेतकऱ्यांचे २०२५-२६ आणि सन २०२६-२७ चे पीक कर्ज भरलेले असणे आवश्यक आहे.
त्यामुळे यासारख्या जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी करावी जेणे करून पडलेले शेतीमालाचे भाव व वाढलेली महागाई या संकटातून शेतकरी उभा राहू शकेल. नसता शेतकऱ्याला आत्महत्येशिवाय पर्याय उरलेला दिसत नाही. याला सर्वस्वी शासन जबाबदार असणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रामधन कळंबे, गणेश बापू चव्हाण, एकनाथ शेवत्रे, संतोष अंभोरे यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे अत्यंत कर्तव्यदक्ष आणि प्रामाणिक अधिकारी संजय देशपांडे यांना पदोन्नतीची भेट

**दत्ता देशमुख**
जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे कार्यरत असणाऱ्या श्री. देशपांडे यांच्या उत्कृष्ट सेवेची दखल घेत, त्यांची () या महत्त्वपूर्ण आणि जबाबदारीच्या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे.श्री. देशपांडे यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत आणि विशेषतः टेंभुर्णी पोलीस स्टेशन अंतर्गत भागात अत्यंत निष्ठेने व पारदर्शकपणे कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम केले आहे. त्यांच्या याच खडतर परिश्रमाचे आणि खाकी वर्दीप्रती असलेल्या निष्ठेचे फलित म्हणून त्यांना ही पदोन्नती मिळाली असून पोलीस वर्तुळातून व जाफराबाद परिसरातील



नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला आनंदाच्या प्रसंगी टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्री. अविनाश राठोड आणि पोलीस उपनिरीक्षक श्री. बाबासाहेब खार्डे यांनी सर्व पोलीस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत श्री. संजय देशपांडे यांचा पुष्पगुच्छ देऊन व पेढे भरवून जंगी सत्कार केला. यावेळी पोलीस निरीक्षक राठोड व उपनिरीक्षक खार्डे यांनी देशपांडे यांच्या कामाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पोलीस ठाण्यातील सर्व अंमलदार व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवीन पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर श्री. संजय देशपांडे यांनी पोलीस निरीक्षक अविनाश राठोड, पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे, सर्व सहकारी कर्मचारी आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार मानले. तसेच, ''वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जनतेची सेवा अधिक तत्परतेने आणि जोमाने करण्यासाठी मी कटिबद्ध राहीन,'' असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.


**आपल्या सेवेमध्ये कर्तव्यनिष्ठता आणि प्रामाणिकपणा असेल, सेवेमध्ये काम करण्याचे सातत्य असेल, सर या कामासाठी सेवेमध्ये पदोन्नती दिल्या जाते नियमित पदोन्नती ज्यांची निवड होते. या ठिकाणी सचोटी आणि कर्तव्य निष्ठता आता कामाला येते. श्री देशपांडे यांना त्यांच्या या निष्ठेचे फळ मिळाले आहे.**
**सपोनी अविनाश राठोड**

**पोलीस दलात काम करताना जनतेचे रक्षण करणे आणि कायदा-सुव्यवस्था टिकवणे हे आपले पहिले कर्तव्य असते. या नवीन पदाच्या माध्यमातून मला अधिक जबाबदारीने काम करण्याची संधी मिळाली आहे. मी तुम्हाला ग्वाही देतो की, वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आणि सर्व सहकाऱ्यांच्या साथीने, टेंभुर्णी परिसरातील नागरिकांची सेवा मी अधिक तत्परतेने, प्रामाणिकपणे आणि जोमाने करत राहीन.**
**-संजय देशपांडे**
**सहाय्यक पोलीस निरीक्षक टेंभुर्णी**

# डॉ. चंद्रशेखर दाभाडकर राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित

## ॲडोलसेंट हेल्थ अकॅडमीच्या राज्य अधिवेशनात पुरस्कार प्रदान

**बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड )**
महाड येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर दाभाडकर यांना ॲडोलसेंट हेल्थ अकॅडमी (महाराष्ट्र राज्य शाखा) तर्फे यंदाचा प्रतिष्ठेचा 'जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. ॲडोलसेंट हेल्थ अकॅडमी ही राष्ट्रीय बालरोगतज्ज्ञ संघटनेची किशोरवयीन आरोग्य क्षेत्रात कार्यरत असलेली विशेष उपशाखा आहे. नवी मुंबई येथील एमजीएम मेडिकल कॉलेजमध्ये आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. दाभाडकर यांनी गेल्या चार दशकांहून अधिक काळ वैद्यकीय सेवेसोबतच पालक जनजागृती, किशोरवयीन मुलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शन, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम,




आरोग्य शिक्षण तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक नेतृत्व अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेऊन त्यांना या प्रतिष्ठेच्या जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. ॲडोलसेंट हेल्थ अकॅडमीच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. सुषमा देसाई, राष्ट्रीय सचिव डॉ. शमिक घोष, राज्य अध्यक्षा डॉ. चित्रा कुलकर्णी आणि राज्य सचिव डॉ. वैशाली शिरशेट्टी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या विशेष कार्यक्रमास अकॅडमीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय बोधनकर, डॉ. उपेंद्र किंजवडेकर, रायगड जिल्ह्यातील अनेक बालरोगतज्ज्ञ तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना डॉ. दाभाडकर यांनी हा सन्मान सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना व मित्रपरिवाराला समर्पित असल्याचे सांगितले.

# प्रशासनाच्या दिरंगाई विरोधात जाफराबाद तहसीलवर ढोल बजाओ आंदोलन; तीव्र घोषणाबाजीने परिसर दुणाणला

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुका स्थानिक प्रशासनाच्या मनमानी कारभाराच्या आणि विविध प्रलंबित मागण्यांच्या संदर्भातील दिरंगाईविरोधात आज जाफराबाद येथे ढोल बजाओ आंदोलन शांततेच्या मार्गाने आणि यशस्वीपणे पार पडले. या आंदोलनाद्वारे संतप्त नागरिकांनी प्रशासनाला जागे करण्यासाठी ढोल वाजवून तीव्र निषेध नोंदवला.आंदोलनाची सुरुवात शहरातील मुख्य छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून झाली. आंदोलनकर्त्यांनी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी



महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि तेथूनच ढोल बजाओ आंदोलनाला प्रारंभ झाला. ढोलाच्या तालावर आणि प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात जोरदार घोषणाबाजी करत हा मोर्चा जाफराबाद तहसील कार्यालयावर धडकला. बोरगाव बु. सजेला कायमस्वरूपी तलाठी मिळालाच पाहिजे, रखडलेल्या कामांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांचे होणारे हाल तातडीने थांबले पाहिजेत,वरुड मंडळाच्या संबंधित अधिकाऱ्याची तात्काळ बदली करण्यात यावी,प्रशासनाचा सुरू असलेला मनमानी कारभार थांबवून जनतेची कामे वेळेत पूर्ण व्हावीत. अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. मोर्चामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी बांधव, तरुण आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते. मोर्चामध्ये मोठ्या संख्येने शेतकरी बांधव, तरुण आणि ग्रामस्थ *(पान २ वर)*

# बसस्थानक परिसरात राबवली मोहीम; मात्र रस्ते व शहर वाहतूक पोलिस शाखेच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह

**मंठा - प्रतिनिधी**

मंठा राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम करणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी जालना विभागाच्या सुरक्षा व दक्षता शाखेकडून मंठा बसस्थानक परिसरात विशेष मोहीम राबवून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. मात्र या कारवाईनंतर रस्ते व शहर वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि रस्त्यावरील वसुलीमुळेच तालुक्यात अवैध प्रवासी वाहतुकीचे जाळे फोफावत असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

मंठा बसस्थानक परिसरातील सुमारे २०० मीटर अंतरात अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. यामध्ये नियमभंग करणाऱ्या सहा वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली. राज्य परिवहन महामंडळाच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली असून, अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एस.टी. महामंडळाच्या महसुलात मोठी घट होत असल्याने ही कारवाई करण्यात आली.

मात्र स्थानिक नागरिकांच्या मते, बसस्थानक परिसरासह शहरातील विविध चौकांमध्ये अनेक वाहने उघडपणे प्रवासी भरत असतात. काही वाहनचालक रस्त्याच्या कडेला वाहन उभे करून प्रवाशांची वाट पाहतात, तर काही ठिकाणी थेट प्रवासी मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू असल्याचे चित्र दिसून येते. हे सर्व प्रकार संबंधित यंत्रणांच्या नजरेआड कसे राहतात, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे,रस्ते वाहतूक पोलिस कर्मचारी जालना मंठा हायवेवर काही वाहनचालकांकडून रस्त्यावरच थांबून *(पान २ वर)*

# सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय निवासी शाळेमध्ये प्रवेशोत्सव साजरा



**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापुर, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, भोकरदन अशा एकुण ३ शासकीय निवासी शाळा कार्यान्वीत आहेत.

आज दि.१५ जुन,२०२६ रोजी जालना जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना व अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलांची शासकीय निवासी शाळा, बदनापुर, भोकरदन येथे प्रवेशात्सव साजरा करण्यात आला. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलींची शासकीय निवासी शाळा, जालना येथील शाळेमधील प्रवेशित मुलींनी प्रवेशोत्सव निमित्त शालेय पुस्ताकांचे व मोबाईल टॅबचे वाटप करण्यात आले आहे. सदर प्रवेशात्सवा दरम्यान विशेष अधिकारी (शा.नि.शा.),डॉ. अनिता राठोड, समाजकल्याण, स्नेहल मोदाळे, संदिप कांबळे, मुख्याध्यापिका, सुर्यकला गोसावी, अधिक्षका भावना चौधरी तसेच शासकीय निवासी शाळेतील सर्व सहाय्यक शिक्षक उपस्थित होते.

# जालना बालकल्याण समिती नियुक्तीपूर्वीच वादाच्या भोवऱ्यात?

## इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनची मुख्यमंत्री व बालविकास मंत्र्यांकडे तक्रार

**जालना - प्रतिनिधी**

जालना येथील बालकल्याण समितीचे अध्यक्ष आणि सदस्यांनी एकमेकांविरोधी गुन्हे दाखल केल्यानंतर ही समिती चांगलीच चर्चेत आली होती. त्यानंतर आता नव्याने गठीत होत असलेली बालकल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ मात्र नियुक्तीपूर्वीच वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. काही आजी-माजी सदस्यांनी यासाठी मुलाखती दिल्या असून, गुन्हे दाखल असलेल्या सदस्यांची यात नियुक्ती होत असल्याची कुणकुण लागताच, इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनने थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे आणि महिला व बालविकास आयुक्त (पुणे) यांच्याकडे लेखी तक्रार करून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

५ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे येथील कार्यालयात बालकल्याण समिती आणि बाल न्याय मंडळाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी मुलाखती आणि लेखी परीक्षा झाली होती. या संदर्भात जालना येथील कार्यालयाने देखील उमेदवारांविषयीचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवला होता. मात्र, जालना येथील काही आजी-माजी सदस्यांनी पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तालयातील अधिकारी राहुल मोरे यांच्याशी संगनमत (सेटिंग) करून आणि आर्थिक देवाणघेवाण करून या समितीवर आपली वर्णी लावल्याची चर्चा आहे. अनेक आजी-माजी सदस्य आपली नियुक्ती निश्चित आहे असा दावा करत असल्याने, या समितीच्या नियुक्ती प्रक्रियेत आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय अधिक बळावला आहे.

त्यामुळे इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी बालकल्याण समिती आणि बाल न्याय मंडळ यांवरील नियुक्त्या अत्यंत पारदर्शकपणे करण्याची मागणी केली आहे.

तसेच पुणे कार्यालयातील अधिकारी राहुल मोरे यांची यासंदर्भात चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बालविकास मंत्री अदिती तटकरे आणि महिला व बालविकास आयुक्त यांच्याकडे केली आहे. मुलाखत देणाऱ्यांमध्ये बालकल्याण समिती आणि बाल न्याय मंडळातील आजी-माजी सदस्यांची संख्या मोठी असल्याने, त्यांनी जुनी ओळख वापरून आर्थिक सेटिंग केल्याची चर्चा रंगली आहे. या दोन्ही समित्या येत्या काही दिवसांत गठीत होण्याची शक्यता असल्याने इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी तातडीने या प्रकरणात तक्रार दाखल करत पारदर्शक नियुक्तीची मागणी केली. ज्या लोकांवर यापूर्वी गुन्हे दाखल झाले आहेत, अशा डागाळलेल्या व्यक्तींना समितीत स्थान देऊ नये, अशी विनंती त्यांनी बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्याकडे केली आहे.



**''भ्रष्टाचाराचा आणि गुन्हेगारीचा अंधार लहान मुलांचे भविष्य काय प्रकाशमय करणार? नवीन समितीच्या नियुक्तीपूर्वीच समोर आलेला हा सेटिंगचा खेळ अत्यंत धक्कादायक आहे. पुणे आयुक्तालयातील अधिकाऱ्यांशी आर्थिक देवाणघेवाण करून डागाळलेल्या चेहऱ्यांची वर्णी लावण्याचा हा प्रयत्न आम्ही कदापि यशस्वी होऊ देणार नाही!''**

**-आमेर खान**

**(जिल्हाध्यक्ष, इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन)**

# राजूर गणपतीसाठी तासाला राजमाता जिजाऊ बस सेवा मंगळवार पासून सुरू होणार

## बाबासाहेब कोलते यांच्या निवेदनाची महामंडळातून दखल

**जालना -प्रतिनिधी**

तीर्थक्षेत्र राजुर गणपती साठी छत्रपती संभाजीनगर येथून दर तासाला राजमाता जिजाऊ बस सेवा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने मंगळवारपासून सुरू होणार असल्याची माहिती भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब कोलते यांनी दिली असून महामंडाळाचे आभार व्यक्त करण्यात येत आहे.



छत्रपती संभाजी नगर ते राजुर गणपती साठी फक्त तीनच बस सेवा कार्यरत होत्या त्यामुळे टाकळी कोलते- पिरबावडा - दाभाडी-तळेगाव व राजुर गणपती परिसरातील शालेय विद्यार्थी यांना जाणे येण्यासाठी व ज्येष्ठ नागरिक व महिला यांना जाणेयेणेसाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता त्यामुळे छत्रपती संभाजी नगर येथून राजुर गणपती साठी व राजुर गणपती पासून छत्रपती संभाजी नगर साठी जास्तीच्या बस गाडी सुरू कराव्या म्हणून भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब पाटील कोलते यांनी फुलंब्री विधानसभा आमदार अनुराधाताई चव्हाण व बदनापूर *(पान २ वर)*

# बालविकास शाळेत पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

## मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण

**जालना - प्रतिनिधी**

कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत आज (दि. १५ जून) नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी शासनाच्या योजनेअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. विद्याताई कुलकर्णी या होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून महिला मंडळाच्या सचिव सौ. सुनंदाताई बदनापूरकर, कायदेशीर सल्लागार सौ. सुखदाताई देशपांडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुजाता परदेशी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते विद्येची आराध्य देवता शारदा मातेच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यानंतर सहशिक्षिका श्रीमती अंजली पाऊलबुद्धे यांनी आवाजात शारदा स्तवन सादर केले.शाळेच्या पहिल्याच दिवशी



हातात नवीन पुस्तके पडल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात सौ. विद्याताई कुलकर्णी यांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणाचे महत्त्व सांगतानाच विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत येऊन अभ्यासासोबतच अवांतर गुणांचाही विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका श्रीमती वंदना ससाणे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार सहशिक्षिका श्रीमती पल्लवी सरकाटे यांनी मानले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या या स्वागतोत्सवासाठी शाळेतील सर्व *(पान २ वर)*

# एफडीएतील धडाकेबाज कारवाईची राज्यभर चर्चा

## मंठ्यात मात्र 'गुपचुप तपासणी'ची चर्चा रंगली

**मंठा - प्रतिनिधी**

मंठा राज्यात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भेसळखोरांविरोधात धडाकेबाज कारवाया सुरू असताना, जालना जिल्ह्यातील एफडीए अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीबाबत मंठा शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जालना येथील एफडीएचे काही अधिकारी मंठा शहरात गुपचुप येऊन जातात . शहरातील काही खाद्यपदार्थ व दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्रांची तपासणी करण्यात येत असल्याची चर्चा आहे. मात्र या तपासणीची अधिकृत माहिती स्थानिक माध्यमांना किंवा नागरिकांना देण्यात येत नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे ही तपासणी नेमकी कोणत्या ठिकाणी झाली, किती नमुने घेण्यात आले आणि त्याचे निष्कर्ष काय आहेत, याबाबत संभ्रमाचे वातावरण आहे.

स्थानिक स्तरावर अशीही चर्चा सुरू आहे की, तपासणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर *(पान २ वर)*

# जालना एलसीबीची धडक कारवाई : चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त; विधीसंघर्षग्रस्त बालक ताब्यात

## अंबड मधील मोटारसायकल चोरीचा उलगडा; पुणे जिल्ह्यातील तीन वर्षांपूर्वीच्या चोरीच्या गुन्ह्याचाही छडा, ६५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात वाहनचोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने () सुरू केलेल्या विशेष मोहिमेला मोठे यश मिळाले असून अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चोरीच्या मोटारसायकल प्रकरणाचा उलगडा करत पोलिसांनी एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत चोरीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून एकूण ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल



हस्तगत करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १२ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनचोरी करणाऱ्या संशयितांचा शोध घेत होते. यावेळी पोलिसांना गोपनीय माहिती प्राप्त झाली की, अंबड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ४३१/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता () अंतर्गत चोरीस गेलेली होंडा युनिकॉर्न मोटारसायकल (क्रमांक -१४--०४७९) साडेसावंगी येथील एका विधीसंघर्षग्रस्त बालकाच्या ताब्यात आहे.

**साडेसावंगी येथे छापा; चोरीची युनिकॉर्न जप्त**

माहितीची खातरजमा करून पथकाने साडेसावंगी येथे शोधमोहीम राबविली. संबंधित बालकाचा शोध घेत त्याला पालकांच्या उपस्थितीत ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने मोटारसायकल चोरीची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या ताब्यातून सुमारे ५० हजार रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल जप्त केली.

या कारवाईमुळे अंबड पोलीस ठाण्यात दाखल वाहनचोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले.

**चौकशीतून पुण्यातील चोरीचाही उलगडा**

ताब्यात घेतलेल्या बालकाकडे अधिक सखोल चौकशी करण्यात *(पान २ वर)*

# टेंभुर्णीच्या डॉ. अनिकेत बोर्डे व डॉ. अथर्व यांचा मानव सेवा मंडळातर्फे सत्कार

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी -येथील डॉ. अथर्व प्रदीप मुळे व डॉ. अनिकेत सुरेश बोर्डे या दोघांनी नुकतीच एमबीबीएस पदवी प्रथम श्रेणीत पूर्ण केली. याबद्दल या दोघांचा स्थानिक मानव सेवा मंडळातर्फे रविवारी सत्कार करण्यात आला. येथील हिना ड्रेसेस मध्ये आयोजित या सत्काराला उत्तर देताना दोघा डॉक्टरांनी आपल्या यशाचे श्रेय आपल्या शिक्षकांसोबत आई-वडिलांना दिले. आपण ग्रामीण भागातील रुग्णांना योग्य सेवा देऊन आपल्याला मिळालेल्या आरोग्य सेवेच्या या संधीचे सोने करू असेही ते म्हणाले.



जिद्द, चिकाटी आणि मेहनत या त्रिसूत्रीवर या दोघांनी मिळवलेले यश परिसरातील युवकांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल. टेंभुर्णी सारख्या ग्रामीण भागातून अनेक विद्यार्थी आता एमबीबीएस ची पदवी घेऊन पुढे येत आहे ही गोष्ट गाव आणि परिसरासाठी अभिमानास्पद आहे. असे विचार यावेळी मानव सेवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. यावेळी अनेकांनी आपल्या भाषणातून डॉ. अथर्व व डॉ. अनिकेत यांच्या बद्दल गौरवोद्गार काढीत त्यांना उज्वल आरोग्य सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानव सेवा मंडळाचे अलकेश सोमानी यांनी केले.

कार्यक्रमाला मानव सेवा मंडळाचे प्रांत सचिव नसीम शेख *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.